# मिरा भाईंदर महानगरपालिका

# माहिती व जनसंपर्क विभाग

# प्रेसनोट

- **मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या ‘फराळ सखी’ उपक्रमाला केंद्राच्या निती आयोगाची मान्यता**
- **अवॉर्ड टू रिवॉर्ड उपक्रमाचा शुभारंभ, मिरा-भाईंदर शहरात महिला उद्योजक घडवणार**

मिरा भाईंदर महानगरपालिकेने महिला सक्षमीकरणासाठी सुरू केलेल्या ‘फराळ सखी’ या उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळाला असून, उपक्रम यशस्वी ठरला आहे. या उपक्रमाची दखल केंद्र सरकारच्या निती आयोगाने घेऊन उपक्रमाला मान्यता दिली आहे. त्यामुळे कायमस्वरूपी महिलांना प्रशिक्षित करून त्यांना उद्योजक म्हणून घडविण्यासाठी नीती आयोगाच्या महिला उद्यम मंचातर्फे ‘अवॉर्ड टू रिवॉर्ड’ या मोहिमेचा मिरा भाईंदर महानगरपालिकेत दिनांक २ जानेवारी २०२५ रोजी शुभारंभ करण्यात आला आहे.

मिरा भाईंदर महापालिकेचे मा. आयुक्त यांच्या वैचारिक दृष्टिकोनातून महापालिका शहराच्या विकासासाठी सातत्याने नावीन्यपूर्ण संकल्पना राबवत आली आहे. महिलांना कायमस्वरूपी उद्योग, रोजगार आणि बाजारपेठ मिळावी यासाठी मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या संकल्पनेतून ‘फराळ सखी’ हा उपक्रम राबविण्यात आला होता. या उपक्रमांतर्गत महिलांना व्यवसायिक पद्धतीने फराळ बनवून त्याची विक्री करण्यासाठी महापालिकेने स्वतंत्र यंत्रणा उभारली होती. महापालिकेने उभारलेल्या मध्यवर्ती स्वयंपाकघरात बचत गटातील महिला व्यावसायिक पद्धतीने दिवाळीचा फराळ केला होता. महापालिकेने महिलांना फराळ विक्रीसाठी जागा उपलब्ध करून दिली असून त्याची जाहिरात महापालिकेतर्फे करण्यात आली होती. या उपक्रमाला ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळाला आणि दिवाळीत तब्बल ३ टन फराळाची विक्री झाली. फराळाचा दर्जा आणि चव उत्तम असल्याने ग्राहकांनी या फराळाला पसंती दिली होती.

या उपक्रमाची दखल केंद्र शासनाच्या निती आयोगाने घेतली आहे. नीती आयोगाच्या महिला उद्यम मंचातर्गत अवॉर्ड टू रिवॉर्ड उपक्रमसाठी फराळ सखीला मान्यता देण्यात आली आहे. गुरुवारी नीती आयोगाच्या प्रमुख आर्थिक सल्लागार ऍना रॉय यांच्या हस्ते ऑनलाइन उद्घाटन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमास, अतिरिक्त आयुक्त अनिकेत मानोरकर, शहर अभियंता दीपक खांबित आणि उपक्रमाच्या प्रशिक्षणासाठी निवड झालेल्या २५ महिला उपस्थित होत्या. नीती आयोगाच्या मान्यतेमुळे शहरातील महिलांना प्रशिक्षण दिले जाणार असून, त्यांच्यातील कौशल्य विकसित करून कायमस्वरूपी रोजगार मिळवून देण्यासाठी तयार केले जाणार आहे. या उपक्रमासाठी मिरा भाईंदर शहरातील २५ महिलांची निवड करून त्यांना व्यवसायासाठी लागणाऱ्या सर्व बाबींचे तंत्रशुद्ध प्रशिक्षण देण्यात येणार आहे. यासाठीची संपूर्ण प्रक्रिया सेंटर फॉर एज्युकेशन, गव्हर्नन्स अँड पब्लिक पॉलिसी यांच्यामार्फत केली जाणार आहे.

इच्छाशक्ती, ज्ञानशक्ती आणि कर्मशक्ती हे आमचे ब्रीद आहे, या विचारांच्या अंतर्गत आम्ही महिलांना सक्षमीकरण करून स्वावलंबी बनवण्यासाठी प्रयत्नरत आहोत. नवे व्यावसायिक घडवणे आणि गृहोद्योग करणाऱ्या महिलांची क्षमता वाढविण्यासाठी या उपक्रमाचे उद्दीष्ट आहे. हा उपक्रम म्हणजे पब्लिक-प्रायव्हेट पार्टनरशीप असून, हा प्रत्यक्ष परिणाम होणारा आहे. फराळ सखी - अवॉर्ड टू रिवॉर्ड उपक्रम हा महिलांना उद्योजक बनवण्यास चालना देणारा ठरेल, असे रॉय यांनी सांगितले. फराळ सखीमुळे आम्हाला, आमच्या खाद्यपदार्थांना बाजारपेठेत स्थान मिळाले. या उपक्रमाच्या सहयोगाने आमचा व्यवसाय वाढला. आज आम्हाला या उपक्रमात सहभागी होण्याची संधी मिळाली असून, आमच्या व्यवसायाला नवी दिशा मिळेल, असे शहरस्तरीय फेडरेशन च्या अध्यक्षा अस्मिता रोकडे यांनी म्हटले.

**अवॉर्ड टू रिवॉर्ड उपक्रम काय आहे?**

नीती आयोग ही भारत सरकारची विकास धोरण ठरवणारी शिखर संस्था आहे. या संस्थैंतर्गत महिला उदयम मंच हा सार्वजनिक-खाजगी भागीदारी उपक्रम आहे जो २०१८ मध्ये सुरू करण्यात आला होता. महिला उद्योजकांना त्यांचे व्यवसाय वाढविण्यात मदत करणे हे या मंचाचे उद्दिष्ट आहे. या मंचाच्या, अवॉर्ड टू रिवॉर्ड हा कार्यक्रमांतर्गत, महिला उद्योजकांना कौशल्य, कायदेशीर अनुपालन, वित्त उपलब्धता, बाजारपेठेतील संबंध, व्यवसाय विकास आणि मार्गदर्शन यांसारख्या क्षेत्रात सहकार्य केले जाते.

दिवाळी सणाच्या धर्तीवर फराळ सखी हा उपक्रम महापालिकेने महिला गृहोद्योगांच्या सर्वांगीण वृद्धीसाठी राबविण्यात आला होता. हा उपक्रम आता पुढे निती आयोगाच्या माध्यमातून पुढे जात आहे, त्यामुळे मिरा भाईंदरच्या महिलांना सर्वोत्तम प्रशिक्षण मिळत असून भविष्यात त्यांचे मोठे उद्योग होणार आहेत. या महिला उद्या समाजातील इतर महिलांना प्रेरणा देतील, इतर महिलांना नोकरीची संधी देतील. तसेच कौशल्य विकसित करून, महिला उद्योजक घडविण्यासाठी महापालिकेमार्फत आमचे प्रयत्न सुरू आहेत असे मिरा-भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय काटकर (भा.प्र.से.) यांनी सांगितले.